-: प्रेस नोट दिनांक- ०८/१०/२०२० :-

**प्रदिप केशव सुर्वे, मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक आयुक्त, वर्ग-१, मत्स्य व्यवसाय कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर, रा. ब्ल्यु बेल अर्पाटमेंट, कारंडे मळा कोल्हापूर,यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत....**

---

यातील तक्रारदार यांचा मत्स्य उत्पादनाचा व्यवसाय असुन त्यांचेकडे दोन जलाशय ठेके तत्वावर आहेत. सन २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांचे जलाशयातील मासे व मासे उत्पादनासाठी लावलेल्या जाळ्या वाहुन गेल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने पुरग्रस्तासाठी नुकसान भरपाई जाहीर केली होती. त्याप्रमाणे तक्रारदार यांचे संस्थेच्या जलाशयांचे महसुल विभागामार्फत रितसर पंचनामे करण्यात आले होते. त्यानुसार अतिवृष्टीमुळे झालेली नुकसान भरपाई मिळणेसाठी सहा. आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालय, जि. कोल्हापूर यांचे कार्यालयाकडुन शासनाकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. सदर प्रस्तावानुसार महाराष्ट्र शासनाकडुन तक्रारदार यांचे संस्थेस माशांची नुकसान भरपाई म्हणुन रू. २६ लाख रक्कम त्यांचे संस्थेच्या बॅंक खात्यावर सहा. आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत दि. १४/०९/२०२० रोजी जमा झाली आहे. परंतु मत्स्य जाळयांची नुकसान भरपाई संस्थेस अद्याप मिळालेली नाही.

त्यानंतर आठवडयाभरापुर्वी तक्रारदार व प्रभारी सहा. आयुक्त सुर्वे यांची भेट झाली. तेव्हा सुर्वे यांनी तक्रारदार यांचे संस्थेला त्यांचे कार्यालयामार्फत पाठविलेल्या प्रस्तावामुळेच २६ लाख रूपये नुकसान भरपाई मिळाली आहे, असे म्हणुन नुकसान भरपाई रक्कमेच्या ४० टक्के रक्कम म्हणजेच साधारण १० लाख रूपये तक्रारदार यांचेकडे मागितले, नाहीतर उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम संस्थेला मिळणार नाही, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना पैसाबाबत विनवनी केली, परंतु त्यांनी काही न ऐकता पैसे दिले तरच पुढील नुकसान भरपाई मिळेल नाहीतर मिळणार नाहीत असे सांगितले होते. त्यानंतरही रविवार दि. २७/०९/२०२० रोजी सुर्वे यांनी तक्रारदार यांची भेट घेवुन परत नुकसान भरपाई मिळवुन दिलेबाबत पैशाची मागणी करून शेवटी ७,००,०००/- रू. तरी कमीत कमी द्यावे लागतील असे लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे सहा. आयुक्त सुर्वे यांचे लाचेच्या मागणीबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दि. २९/०९/२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे मत्स्यव्यवसाय कार्यालयाचे सहा. आयुक्त सुर्वे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचे संस्थेस अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई रक्कम मिळवुन दिली म्हणुन प्रथम १०,००,०००/- रू. व त्यानंतर ७,००,०००/- रू. लाचेची मागणी केली. त्यानंतर परत तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/- रू. लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हफ्ता २,००,०००/- रू. व नंतर उरलेले ३,००,०००/- रू. लाच रक्कम देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

आजरोजी सहा. आयुक्त सुर्वे यांनी तक्रारदार यांना फोन करून तक्रारदार यांचे ऑफिसमध्ये येत असल्याचे सांगितलेने तेथे सापळा कारवाई आयोजित केली असता, सहा. आयुक्त प्रदिप सुर्वे यांनी तक्रारदार यांचे ऑफिसमध्ये येवुन २,००,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेवर यशस्वी सापळा कारवाई करणेत आलेली आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून प्रदिप केशव सुर्वे, मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर, रा. ब्ल्यु बेल अर्पाटमेंट, कारंडे मळा कोल्हापूर यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सीमा मेंहदळे, प्रभारी अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ शरद पोरे व अजय चव्हाण, पोकॉ रुपेश माने व मयुर देसाई, चालक पोहेकॉ सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.